सायं.दैनिक
आवाज जनसामान्यांचा..
# बीड किसान
• संपादक : शेख कामरान •

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ७३ ▪ शनिवार, दि. १९ जुलै, २०२५ ▪ पोस्टल दिनांक २० जुलै, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-73 ▪ Saturaday 19 July, 2025 ▪ Postal Date 20 July, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## कामावर उशीरा का आला म्हणून कान कापले

बीड (किसान न्युज): रूपचंद मेहराज भोसले वय २७ वर्ष व्यवसाय मजुरी राहणार कानडी हा कीरशा शेतकर काळे व उमेद कीरशा काडे राहणार तांदळी टाकली तालुका श्रीगोंदा जिल्हा अहमदनगर यांच्या कडे मजूर म्हणून काम करत होता काही कारणास्तव कामावर येण्यास उशीर झाला असता वरीलदोन्ही आरोपी ने संगमत करीत दिनांक १७/७/२०२५ रोजी फिर्यादी च्या गाव कानडी बुद्रुक तालुका आष्टी येथे त्यांच्या घरी जाऊन तू कामावर नेहमीच उशिरा का येतो असे सांगत त्याच्या कानावर चाकूने वार करीत यावरून दिनांक १८ /७ /२०२५ रोजी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बजरंग बप्पांमुळे जिल्ह्याच्या विकासाला बुस्टर डोस!



## उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद रेल्वे मार्ग जागेची हेलिकॉप्टर द्वारे पाहणी सुरू झाली

### शुक्रवार पासून सुरु झालेली पाहणी आज आणि उद्या ही होणार


बीड । किसान न्युज

**जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पहिल्याच अधिवेशनात उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद या नवीन रेल्वेची मागणी केली होती. या मार्गाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दिला होता. प्रत्यक्षात आता या रेल्वे मार्गाची जागा पाहणी शुक्रवार (दि.१८) पासून सुरू झाली असून आवश्यक त्या ठिकाणी हेलिकॉप्टर द्वारे हवाई पाहणी करण्यात येत आहे. ही गती पाहता खा. बजरंग सोनवणे यांच्यामुळे बीड जिल्ह्याला बुस्टर डोस मिळणार असे दिसून येत आहे. ही पाहणी आज आणि उद्या होणार आहे. यासाठी हेलिकॉप्टरचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती जागा पाहणी करणाऱ्या हैदराबाद येथील कंपनीने संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.**

बीड जिल्ह्यातील परळी वगळता कुठेही रेल्वेची सुविधा नाही. रेल्वे सुविधा सुरू झाली तर जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल व्यापाऱ्यांना माल आणण्यासाठी सोयीचे ठरेल खर्च वाचेल, तसेच दळणवळण वाढून मागास असलेल्या जिल्ह्यात व्यापार वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण होईल म्हणून अनेक प्रयत्नानंतर परळी-बीड-अहमदनगर हा रेल्वे मार्ग मंजूर झाला. पन्नास वर्षांपासून पाहत आलेले बीडकरांचे स्वप्न टप्प्यात आले असून सध्याचे सुरू असलेले काम पाहता हा रेल्वे मार्ग वर्ष दोन वर्षांत पूर्ण होईल असे दिसून येत आहे. या मार्गाचे काम गतीने सुरू असतानाच बीडचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पहिल्याच अधिवेशनात उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद या नवीन रेल्वे मार्गाची मागणी केली होती. ही मागणी करताच यास केंद्र सरकारने हिरवा कंदील दिला होता. पण मागणी करुन ते शांत न बसता या मार्गावर सतत पाठपुरावा सुरू केला. या रेल्वे मार्गाच्या सर्व्हेक्षणासाठी निधीची तरतूद करुन घेतली होती. तर आता या बीड जिल्ह्यासाठी अत्यंत म्हतवाचा आणि विकासाला चालना देणारा उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद रेल्वे मार्गाच्या प्राथमिक सर्व्हेक्षणाचे आदेश मध्य रेल्वेने » पान २ वर

# तुकडे बंदी कायदा रद्द!

### अंमलबजावणी साठी काही दिवसांची प्रतिक्षा



मुंबई । किसान न्युज

अनेक वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या जमीन तुकडे बंदी कायद्याची घोषणा करण्यात आली असल्याने यामुळे गुंठा, दोन गुंठे जमीन खरेदी-विक्री करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या कायदा रद्दची घोषणा झाली असलीतरी अद्याप अंमलबजावणी सुरू झालेली नाही. यामुळे नागरीकांना पंधरा दिवसांची प्रतिक्षा करावी लागणार आहे. महाराष्ट्रातील धारण जमिनींचे तुकडे करण्यास प्रतिबंध करणाऱ्या १९४७ च्या कायद्यानुसार, ठराविक मर्यादेपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या जमिनींची खरेदी-विक्री बंदी होती. या पार्श्वभूमीवर आता सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. १ जानेवारी २०२५ पर्यंत शहरी भाग, गावठाणापासून २०० मीटरपर्यंतच्या क्षेत्रात आणि विविध प्राधिकरणाच्या हद्दीतील जमिनींबाबत एक गुंठेपर्यंतचे झालेले तुकड्यांचे व्यवहार वैध ठरवले जाणार आहेत. त्यामुळे एक गुंठेपर्यंतच्या जमिनीच्या व्यवहारांवर लागू असलेला तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात येईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. या निर्णयाबाबत सविस्तर माहिती देताना त्यांनी सांगितले की, या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील १५ दिवसांत आदर्श कार्यपद्धती (एसओपी) तयार केली जाईल. या निर्णयामुळे सुमारे ५० लाख कुटुंबांना जमिनीच्या व्यवहारात दिलासा मिळणार आहे. मात्र, १ जानेवारी २०२५ नंतरच्या सर्व व्यवहारांवर विद्यमान नियम व कायद्यांनुसार कार्यवाही केली जाईल.

# आडस-अंबाजोगाई रस्ता ठरणार 'ग्रीन रुट'

### आ.मुंदडांच्या सूचनेवरून दोन्ही बाजूने वृक्षलागवड सुरू





आडस । किसान न्युज

केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी मतदारसंघात भरघोस निधी आणून रस्त्यांचा विकास केला असून, आडस-अंबाजोगाई रस्त्यासाठी निधी आणून नूतनीकरण केले आहे. या रस्त्यावर दोन्ही बाजूने वृक्षलागवड सुरू झाल्याने हा रस्ता आता 'ग्रीन मार्ग' ठरणार आहे. केज मतदारसंघातील अनेक रस्त्यांची दैना झाली होती. यामुळे मतदारसंघातील जनतेला अडचणींचा सामना करावा लागत होता. जनतेची ही अडचण ओळखून भरघोस निधी » पान २ वर

शहरी भागातील माओवादी कारवायांना आळा घालण्यासाठी

## महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा : अ‍ॅड.महेश धांडे

बीड । किसान न्युज



संविधानिक लोकशाहीला सशस्त्र मार्गाने उलथवून टाकण्याचं ध्येय बाळगणाऱ्या माओवाद्यांच्या शहरी भागातील आघाडी संघटना, ज्यांना शहरी माओवादी म्हटलं जातं, ते शहरी माओवादी समाजातील विविध घटकांत लोकशाही व्यवस्थेप्रति असंतोषाची भावना पसरवून अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. दुर्गम अशा जंगल भागातील सशस्त्र माओवाद्यांना सर्व प्रकारची मदत व समर्थन उभं करणे, शहरी भागातून तरुणांची भरती करणे, शस्त्रास्त्रांची खरेदी करून ती जंगल भागात पोहचवणे, बेकायदेशीर कारवायांसाठी पैशांचं व्यवस्थापण करणे, लोकशाही व्यवस्थेप्रति असंतोष निर्माण करणे, संविधानिक लोकशाहीची विश्वासार्हता धोक्यात आणणे, आणि सशस्त्र माओवादी क्रांतीसाठी अनुकूल वातावरण तयार करणे, इत्यादी प्रकारच्या कारवाया शहरी माओवादी करीत असतात. माओवाद्यांच्या या शहरी भागातील फ्रंट संघटना » पान २ वर

# शहरातील खड्ड्यांमध्ये कचरा भरुन नगरपालिकेचा अब्रू झाकण्याचा प्रयत्न

बीड । किसान न्युज



बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक बलभीम चौक पर्यंत चा रस्ता पूर्णपणे उखडून गेला आहे अनेक वेळा आंदोलने करून निवेदने देऊन सुद्धा रस्त्याच्या मालकीच्या वादावरून हे काम अजूनही झालेले नाही हा शहरातील मुख्य रस्ता असल्याने या रस्त्यावरून दिवसभर वाहतूक असते नगरपालिका च्या वतीने हा रस्ता आमच्या हद्दीत नसून सार्वजनिक बांधकाम खाते यांचे हद्दीत आहे असे सांगण्यात येते जर हा रस्ता खरोखरच बांधकाम खात्याच्या अधिकार तर मग या रस्त्यावरील बसलेले गोरगरिबांच्या अतिक्रमण हटवण्याचा नगरपालिकाला अधिकार आहे का असाही प्रश्न जनतेतून निर्माण होत आहे अनेक वेळा तक्रारी झाल्याबद्दल व विविध वर्तमान पत्रातून याबाबतीत बातम्या छापून » पान २ वर

# गेवराई नगरपरिषद स्वच्छता विभागाला खडबडून जाग!

### दैनिक किसान च्या बातमीचा दणका


किसान
गेवराईच्या संजय नगरभागात स्वच्छतेचा वनवास संपेना!
खाजगी टेंडर मुळांवर स्वच्छतेची गाडी येईल का रुळावर?; अनेक भागात नालीसफाईला मुहूर्त मिळेना स्वच्छता विभागाला कांहीच कळेना
Page 1 | 18 Jul 2025 | www.beedkisan.in
Powered by Softisky | 9764331134




गेवराई । किसान न्युज

येथील संजयनगर भागात मागील दोन महिन्यांपासून स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याने सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले होते. यामुळे रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात होती. याप्रश्नी दैनिक किसानने काल बातमी प्रकाशित केली. या बातमीच्या दणक्याने नगरपरिषदेचा स्वच्छता विभाग खडबडून जागा झाला असून आज सकाळी या भागात स्वच्छता सुरू केली असून यामुळे जनतेतून समाधान व्यक्त करीत किसानचे आभार मानले जात आहे. संजय नगर भागातील नाली सफाई गेल्या » पान २ वर



बीड :- तालुक्यातील जरूड येथे बीड पोलीस दलातिल कर्मचारी विष्णू काकडे यांनी दोन एकरमध्ये काशीफळ भोपळ्याची लागवड केली. सध्या हे फळ विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत.

# अनुदानाचे कारण पुढे करत संस्थाचालकांचा सीसीटीव्ही कडे कानाडोळा

बीड । किसान न्युज

राज्यातील बदलापूर शाळेमध्ये घडलेल्या घटनेनंतर राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्हीसह अन्य सुरक्षात्मक उपाय योजना करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले असून सुद्धा अजून जिल्ह्यातील ३६९८ शाळा पैकी फक्त ७९५ शाळांमध्येच सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण झाले असल्याची माहिती समोर आली आहे विविध बाबतीवर होणारा खर्च काही शाळांना बेलवता येत नसल्यामुळे अनेक शाळांनी तुला हा नवीन खर्च नको म्हणून सीसीटीव्ही बसविण्याचे टाळले आहे आता शाळाच सुरक्षात्मक उपाययोजना करण्याचे टाळते असल्या कारणाने आपल्या पाल्याची सुरक्षेची जबाबदारी पालकांनी स्वतः घेण्याची वेळ आली आहे. खासगी शाळांमध्ये प्रमुख मोक्याच्या ठिकाणी एक महिन्याचे बॅकअप असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधन कारक आहे व ते



नियमित कार्यरतअसावे असे आदेश असून सुद्धा अनेक शाळांमध्ये सी सी टीव्ही फक्त शोभेची वस्तू बनून राहिले आहेत तसेच या करिता शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना डीपी सी अंतर्गत पाच टक्के निधी सी सी टीव्ही साठी वापरण्याची मुभा » पान २ वर

# राजुरीत देशी-विदेशी दारु अड्ड्यांवर छापे



बीड । किसान न्युज

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या राजुरी (न) मधील दारूच्या अड्ड्यांवर छापा मारून लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे व स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांनी या कारवाया केल्याचे कळते. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यावर कठोर करावायांच्या सूचना दिलेल्या असताना राजुरीमध्ये दारूची विक्री जोरात सुरु होती.हातभट्टीचे अड्डे सुरु असल्याचे पोलिसांना कळल्यानंतर पहाटे ५ वाजल्यापासून राजुरीतील सहा ठिकाणी छापा मारण्यात आले.या कारवाईत ४ लाखांच्या देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आली असून हातभट्टी दारूचे अड्डे उद्धवस्त करण्यात आल्याचे कळते.या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे,स्थानिक गुन्हे शाखेतील आनंद मस्के,नामदेव सानप,दादा सानप,बळीराम राठोड,पठाण,चालक पवार यांचा समावेश होता.

# कार पलटी होऊन दोन ठार; दोन गंभीर जखमी

### धुळे-सोलापूर महामार्गावर भीषण अपघात

बीड । किसान न्युज



भरधाव वेगातील कार पलटी होऊन दोनजण जागीच ठार तर दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना आज शनिवारी पहाटे जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या पारगाव जवळ धुळे-सोलापूर महामार्गावर घडली आहे. जखमींवर उस्मानाबाद येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ऋषिकेश अवताडे (वय २७वर्ष ) अजिंक्य लिंबे (वय २१ वर्षे) दोघेही रा. औरंगाबाद असे मयतांची नावे आहेत तर मयूर गवांडे (वय २५ वर्षे) रोहन जाधव (वय २४ वर्षे) हे गंभीर जखमी आहेत. हे तरुण कार एक्स यू व्ही ७०० क्रमांक एम.एच. २० एच बी ९७७६ मध्ये औरंगाबाद येथून तुळजापूर येथे जात होते. दरम्यान ते धुळे-सोलापूर महामार्गावरील पारगाव जवळ आले असता कार रस्त्याच्या खाली जाऊन पलटी होऊन घडलेल्या भीषण अपघातात दोघं जागीच ठार झाले तर दोघं गंभीर » पान २ वर

## धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीत भक्तांनी मोठ्या संखेने सहभागी व्हावे : अंबादास गिरी

गेवराई । किसान न्युज



गेल्या अनेक वर्षांपासून धाकलगाव, गेवराई, येथील माऊली भक्त आषाढ महिन्यांत धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी अशी पायी दिंडीचे आयोजन करण्यात येत असून याही वर्षी आज दि.२० जुलै रोजी पायी दिडी निघणार आहे तरी या दिंडीत सहभागासाठी माऊली भक्तांनी ८६६९०९२०९४ या मोबाईल नबंरवर संपर्क साधून धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान माऊली भक्त अंबादास गिरी, विठ्ठल जगदाळे,वादे, दशरथ गावडे, बळीराम उडें, अशोक बीडे, यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की गेली अनेक वर्षांपासून धाकलगाव, गेवराई ते चाकरवाडी पायी दिंडीचे आयोजन माऊली ग्रुपच्या वतिने करण्यात येत असून या दिंडीत मोठ्या प्रमाणात सहभाग घेत असतात तसेच धाकलगाव, शहागड, गेवराई, गढी,राजणी, पाडंळसिगी, » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
✆ 9850643058
सोने २४ कॅरेट 98,300
२२ कॅरेट 96,000
चांदी प्रतिकिलो 112,000